2021-2022

SAHAKARBHUSHAN S. K. PATIL COLLEGE, KURUNDWAD
NIOE MAH.-3584 KOL.-85

I/C PRINCIPAL
Sahakarbhushan S.K.Patil
College, Kurundwad.

11/11/2022

# नोटीस

तक्रार निवारण विभागातील सर्व सदस्यांना कळविण्यात येते की दि. 11/11/2021 रोजी सकाळी 11.00 वाजता प्राचार्य केबिन मध्ये विभागाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित रहावे.

(डॉ. सौ. व्ही. व्ही. मिणचेकर)

प्र. प्राचार्य डॉ. वाय. एम. चव्हाण (अध्यक्ष)

डॉ. एस. ए. तांबडे (सदस्य)

K. PATIL COLLEGE, KURUNDWAD

# बैठकीचे इतिवृत्त

दि. ११।११।२०२१ रोजी तक्रार निवारण कक्षाची बैठक घेण्यात आली. या बैठकीचा अहवाल पुढीलप्रमाणे :-

विषय १: मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
दि. ०८।०७।२०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

विषय २: दिलेल्या नियोजनाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत चर्चा करणे.
सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी तक्रार निवारण विभागाचे नियोजन जुलै २०२१ मध्ये करण्यात आले. व त्यानुसार वर्षभरामध्ये कार्यवाही करण्याबाबत चर्चा करण्यात आली. सर्व सदस्यांनी त्यास मान्यता दिली.

विषय ३: विद्यार्थ्यांची बैठक आयोजित करणेबाबत
विद्यार्थ्यांना तक्रार निवारण कक्षाची माहिती देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या तक्रारी किंवा सूचना जाणून घेण्यासाठी मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विद्यार्थी व सदस्य यांची एकत्रित बैठक आयोजित करण्याचा ठराव करण्यात आला. सर्वानुमते या ठरावास मान्यता देण्यात आली.

विषय ४: तक्रारपेटी अथवा सूचनापेटी उघडण्याबाबत.
विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी प्राचार्य केबिनजवळ सूचनापेटी लावण्यात आली आहे. ही सूचनापेटी महिन्यातून एकदा उघडून त्यातील सूचना अथवा तक्रारी चेक करून त्यानुसार कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. सर्व सदस्यांनी त्यास मान्यता दिली.

विषय ५: विद्यार्थ्यांशी वैयक्तिक संपर्क साधणेबाबत -
विभागातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी, खास करून विद्यार्थिनींशी संपर्क साधून त्यांच्या अडचणी अथवा समस्या जाणून घेण्याचे ठरविण्यात आले. सर्वांनी त्यास मान्यता दिली.

05/01/2022

# नोटीस

तक्रार निवारण कक्षातील सर्व सदस्यांना कळविण्यात येते की दि. 05/01/2022 रोजी सकाळी ठीक 11.30 वाजता प्राचार्य केबिनमध्ये विभागाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित रहावे.

(डॉ. सौ. व्ही. व्ही. मिणचेकर)

प्र. प्राचार्य डॉ. वाय. एम. चव्हाण (अध्यक्ष)

डॉ. एस. ए. तांबडे (सदस्य)

COLLEGE, KURUNDWAD

## बैठकीचे इतिवृत्त

दि. ०५/०१/२०२२ रोजी तक्रार निवारण कक्षाची बैठक घेण्यात आली. या बैठकीचा अहवाल पुढीलप्रमाणे -

विषय १: मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
दि. ११/११/२०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

विषय २: तक्रार निवारण कक्षाच्या प्रथम सत्रातील कामाचा आढावा घेणे.
प्रथम सत्रामध्ये महिन्यातून एकदा सूचनापेटी उघडून पहाण्यात आली. परंतु विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार उपलब्ध झाली नाही. तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींशी वैयक्तिक संपर्क साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

विषय ३: द्वितीय सत्रामध्ये विद्यार्थ्यांसोबत बैठक आयोजित करण्याबाबत.
तक्रार निवारण कक्षाच्या वतीने एप्रिल २०२२ मध्ये विद्यार्थ्यांसोबत बैठक घेण्याबाबत चर्चा करण्यात आली. सर्वांनी या ठरावाला मान्यता दिली.

(डॉ. सौ. व्ही. व्ही. मिणचेकर)

प्र. प्राचार्य डॉ. वाय. एम. चव्हाण (अध्यक्ष)
डॉ. एस. ए. तांबडे (सदस्य)

COLLEGE, KURUNDW

दि. 15/02/2022

नोटीस

दि. 15/02/2022 रोजी सकाळी 11.00 वाजता प्राचार्य केबिन-मध्ये तक्रार निवारण विभागाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित रहावे.

(डॉ. श्री. डी. डी. मिणचेकर)

प्र. प्राचार्य डॉ. वाय. एम. चव्हाण (अध्यक्ष)
डॉ. एस. ए. तांबडे (सदस्य)

SAHAKARBHUSHAN S. K. PATIL COLLEGE, KURUNDWAD
NIOE MAH - 3584 KOL - 85

## बैठकीचे इतिवृत्त

श्री. योगेश कवठेकर यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे केलेल्या नियमबाह्य फी वसूल करुन घेतले बाबतच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि. 15/02/2022 रोजी तक्रार निवारण कक्षाच्या वतीने तातडीची बैठक आयोजित करण्यात आली, त्याचा वृत्तांत पुढीलप्रमा[णे]

विषय 1: मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

दि. 05/01/2022 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

विषय 2: श्री. योगेश कवठेकर यांच्या 09/02/2022 च्या फी संदर्भातील तक्रार अर्जाबाबत.

दि. 09/02/2022 रोजी श्री योगेश कवठेकर यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर व मा. सहा. आयुक्त समाज कल्याण, कोल्हापूर यांच्याकडे केलेल्या तक्रार अर्जासंदर्भा[त] सारासार चर्चा झाली. दि. 15/07/2021 च्या नोटीसप्रमाणे मागासवर्गी[य] विद्यार्थ्यांना (146 विद्यार्थी) फी परत करण्याबाबत निर्णय घेण्यात आ[ला] होता. त्या नोटीसीच्या आधारे एकूण 19 मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी अर्ज केला आहे. त्या विद्यार्थ्यांना फी परत देण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्वरीत विद्यार्थ्यांना त्यांचे अर्ज घेऊन तातडीने फी परत करण्यात यावी व त्याबाबतचे स्मरणपत्र पुन्हा उर्वरीत विद्यार्थ्यांना नोटि[स] बोर्डवर लावण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. व तशा बाबतच्या अहवाल शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मा. सहा. आयुक्त समाज कल्याण, कोल्हापू[र] व मा. शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण, कोल्हापूर तसेच तक्रारदार श्री. योगेश कवठेकर, रा. गणेशवाडी यांना पाठवून देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

विषय 3: सत्र 2 परीक्षेवेळी सी.डी.ए. म्हणून 10/- रक्कम घेतल्याबा[बत]

परीक्षा फॉर्म भरतेवेळी विद्यार्थ्यांकडून सी.डी.ए. म्हणून 10/- घेण्यात आले आहेत. याविषयावर चर्चा करताना असे लक्षात आले की सदरची फी ही ऑनलाईन परीक्षा फॉर्म भरणे व प्रिंट काढणे याका[रिता]

स्टेशनरीसाठी सदरचे १०/- रु. खर्ची पडलेली असल्यामुळे सदर १०/- रु. परत करण्यात येऊ नयेत असे सर्वानुमते ठरले.

(डॉ. सौ. व्ही. व्ही. मिणचेकर)

प्र. प्राचार्य डॉ. वाय. एम. चव्हाण (अध्यक्ष)
डॉ. एस. ए. तांबडे (सदस्य)

नोटीस

दि. २४/०४/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता प्राचार्य केबिन-मध्ये तक्रार निवारण विभागाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित रहावे.

(डॉ. सौ. व्ही. व्ही. मिणचेकर)

प्र. प्राचार्य डॉ. वाय. एम. चव्हाण (अध्यक्ष)
डॉ. एस. ए. तोंबडे (सदस्य)

SAHAKARBHUSHAN ... PATIL COLLEGE, KURUNDWAD
MAH-3504 KOL-85

# बैठकीचे इतिवृत्त

दि. २४/०५/२०२२ रोजी तक्रार निवारण कक्षाची बैठक घेण्यात आली. या बैठकीचा अहवाल पुढीलप्रमाणे -

विषय १: मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे -
दि. १३/०२/२०२२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

विषय २: सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षातील तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजाचा आढावा घेणे.
बैठकीच्या वेळी चालू शैक्षणिक वर्षातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. या वर्षामधील द्वितीय सत्रामध्ये विद्यार्थ्यांची बैठक घेऊन त्यांना तक्रार निवारण कक्षाची माहिती देण्यात आली. तसेच दर महिन्याला तक्रारपेटी उघडून पहाण्यात आली. परंतु विद्यार्थ्यांच्या काहीही तक्रारी अथवा सूचना आढळून आल्या नाहीत. विद्यार्थ्यांच्या फी संदर्भात श्री योगेश कवठेकर यांनी केलेल्या तक्रारअर्जावर विद्यार्थी विकास तक्रार निवारण कक्षाची तातडीची बैठक घेऊन कार्यवाही करण्यात आली. तसेच विभागातील सदस्यांनी वैयक्तिकरित्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

विषय ३: अहवाल सादर करणे.
तक्रार निवारण कक्षाच्या सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

विषय ४: कामकाज नियोजन सादर करणेबाबत -
सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील विभागाच्या कामकाज नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांची बैठक घेणे, सूचनापेटी उघडून पहाणे, तसेच विद्यार्थ्यांशी वैयक्तिक संपर्क साधण्याचे ठरले.